लोकसत्ता पा.नं.१८

# वसई, विरार शहरात जाहिरात फलकांचा धोका कायम

## शंभर फुटी रस्त्यावर लोखंडी सांगाडा कोसळून महिला जखमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरार शहरात धोकादायक पद्धतीने लावल्या जाणाऱ्या जाहिरात फलकांमुळे अपघातांचा धोका कायम आहे. नुकताच वसई पश्चिमेच्या शंभर फुटी रस्त्याच्या कडेला जाहिरात फलकाची लोखंडी सांगाडा कोसळून महिला जखमी झाली. या दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा शहरातील धोकादायक जाहिरात फलकांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वसई, विरार शहरात काही ठिकाणी नियमबाह्य व महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच जाहिरात फलक उभे करण्यात येत असतात. मुख्य रस्ते, वळणाचे रस्ते, चौकात जाहिरात फलक लावताना कोणतीच काळजी घेतली जात नसल्याने अपघाताच्या घटना घडत आहेत.

वसई पश्चिमेच्या शंभर फुटी रस्त्यावर घडलेल्या घटनेबद्दल पालिका अनभिज्ञ होती. घटनेची माहिती मिळताच माणिकपूर पोलिसांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देत विचारणा केली. मात्र याबाबत कोणतीही तक्रार आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### पालिकेच्या दुर्लक्षामुळे दुर्घटना

मुंबईतील घाटकोपर येथे जाहिरात फलक कोसळून १७ जणांच्या मृत्यू प्रकरणानंतर वसई, विरार महापालिकेने शहरातील धोकादायक व बेकायदा जाहिरात फलक हटविण्याची कारवाई सुरू केली होती. आता कारवाई थंडावल्याने पुन्हा शहरात बेकायदा व धोकादायक जाहिरात फलक लावण्याचे काम सुरू आहे. दुर्लक्षितपणामुळे दुर्घटना होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### कारवाईची मागणी

शंभरफुटी रस्त्यावर विद्युत यंत्रणा ज्या ठिकाणी आहे अशाच ठिकाणी धोकादायक पद्धतीने हा फलक लावला जात होता. त्यांच्या हातातून हा फलक सुटला आणि पादचारी महिलेच्या अंगावर पडला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते महेश सरवणकर यांनी सांगितले. याबाबत जाहिरातफलक धारकावर कारवाई करावी, अशी मागणी प्रभाग समिती एच च्या सहायक आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

# आडणे परिसरातील खदाणी बंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई पूर्वेच्या आडणे भिनार परिसरात दगड उत्खनन करण्यासाठी खदाणीत स्फोट घडवून आणले जात होते. तर दुसरीकडे क्रशर यंत्रांमुळे परिसराची धूळधाण झाली होती. नागरिकांच्या तक्रारीनंतर पालकमंत्र्यांनी याची चौकशी करून त्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या खदाणी आता बंद करण्यात आल्या आहेत.

निसर्ग सौंदर्याने नटलेल्या वसई तालुक्यात आता विकासकामांनी व विविध प्रकल्पांच्या कामांनी जोर धरला आहे. त्यामुळे खडी, दगड, माती यांची मागणीही वाढत आहे. दगड उत्खनन, क्रशर चालवून ही मागणी पूर्ण केली जात आहे. उत्खननामुळे रस्त्यांची दुरवस्था, धुळीचे साम्राज्य, दगड फोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकामुळे आजूबाजूच्या परिसराचे तसेच उडणाऱ्या धुळीकणामुळे होणारे शेतीचे नुकसान यामुळे नागरिक त्रस्त होते. याबाबत येथील नागरिकांनी वेळोवेळी महसूल विभागासह जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. याबाबत ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ठराव मांडूनही दुर्लक्ष केले जात होते. ग्रामस्थांनी पालघर येथे पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात हा प्रश्न मांडला होता.

त्यावर पालकमंत्र्यांनी निर्णय घेऊन तात्काळ या खदाणींची तपासणी करून त्यावर कारवाई करण्यात यावी, असे आदेश दिले होते.

# बोगस डॉक्टरवर कारवाई

## माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार शहरात बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. पालिकेने आणखीन एका बोगस डॉक्टरविरोधात कारवाई केली आहे. नवघर पूर्वेच्या आझादनगर परिसरात कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना आयुर्वेदिक दवाखाना चालविला जात असल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विविध ठिकाणी वाढते बेकायदा बांधकाम व बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागात बोगस डॉक्टर दवाखाने थाटू लागले आहेत. नुकतेच नवघर पूर्वेच्या आझादनगर परिसरात इस्तेखार एम शेख हा कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना मिलाप युनानी नावाने आयुर्वेदिक दवाखाना चालवत असल्याचा प्रकार पालिकेच्या नवघर आरोग्य पथकाने उघड केला आहे.

या प्रकरणी नवघर नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता पटेल यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी बोगस डॉक्टर इस्तेखार एम. शेख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

← लोकसत्ता पा.नं.१९.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा-नं.५.

# उत्तन-चौकच्या अरुंद रस्त्यावर अवैध पार्किंग

## वाहतुकीला होतोय अडथळा; फेरीवाल्यांचे अवैधरीत्या रस्त्यावरच ठाण

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदरच्या उत्तन ते चौक दरम्यानचा रस्ता अरुंद असतानाही या रस्त्यावर अवैधरीत्या वाहनांची पार्किंग केली जात असल्याने त्याचा वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊ लागला आहे. अशा वाहनांवर वाहतूक शाखेसह स्थानिक पोलिसांनी कारवाई करावी. तसेच उत्तन येथे फेरीवाले अवैधरीत्या रस्त्यावरच ठाण मांडत असल्याने त्यांच्यावर पालिकेने कारवाई करून वाहतुकीचा रस्ता मोकळा करावा, अशी मागणी स्थानिकांकडून होऊ लागली आहे.

उत्तन ते चौक दरम्यानचा रस्ता पूर्वी ९ मीटर इतका अरुंद होता. काही वर्षांपूर्वी त्याचे रुंदीकरण करून तो १२ मीटरपर्यंत रुंद करण्यात आला. यामुळे स्थानिक वाहन चालकांसह परिवहन सेवेच्या बस चालकांना चांगला दिलासा मिळाला होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावरील उत्तन सी फूड जवळ मोठ्याप्रमाणात डंपर, टेम्पो, ट्रक, रिक्षा, व खाजगी वाहने थेट वाहतुकीच्या रस्त्यावर अवैधरीत्या पार्क करण्यात येत आहेत. यामुळे रस्त्याच्या दोन्हीकडील बाजूस अवैधरीत्या पार्क केलेल्या वाहनांमुळे वाहतुकीसाठी रस्ता मोठ्याप्रमाणात अरुंद ठरू लागला आहे. परिणामी परिवहन सेवेच्या बस तसेच मासळी वाहून नेणारी वाहनांना येथील पुरेशा रस्त्याअभावी ये-जा करणे अडचणीचे ठरू लागले आहे. तर बसमधून प्रवास करणारे चाकरमानी, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांना कार्यालय, दवाखाने व शाळा, महाविद्यालयात पोहोचण्यास विलंब होऊ लागला आहे. सध्या विद्यार्थ्यांची सहामाही परीक्षा सुरु असून त्यांना वेळवर परीक्षेला पोहोचणे अवघड होऊ लागले आहे. त्यातच रस्त्यावरील अवैध पार्किंगला विरोध केल्यास वाद होऊ लागले आहेत. याखेरीज उत्तन येथील रस्त्यावर फेरीवाले अवैधरीत्या ठाण मांडू लागल्याने तेथील वाहतूक कोंडीतून वाट काढणे पदचाऱ्यांना तसेच वाहनांना जिकरीचे ठरू लागले आहे. येथील वाहतूक विना अडथळा सुरु ठेवण्यासाठी वाहतूक शाखा व स्थानिक पोलिसांनी अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनांवर तर रस्त्यावर ठाण मांडून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या अवैध फेरीवाल्यांवर पालिकेने ठोस कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून होऊ लागली आहे.



वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांच्या अवैध पार्किंगवर कारवाई करण्यावाबत वाहतूक शाखेला पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच पालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयाकडे सुद्धा अवैध फेरीवाल्यांविरोधात तक्रार करण्यात आली आहे. मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे वाहतूक कोंडीतूनच स्थानिक वाहचालक व परिवहन सेवेच्या बसेसना ये-जा करावी लागत आहे.
**-बर्नड डिमेलो,** माजी नगरसेवक

लोकमत पु-पा-४

# जागेसह घर विक्रीत फसवणूक

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** काशिगाव डाचकुलपाडा भागात जमीन आणि त्यावर घर बांधकामाचे १३ लाख ५० हजार रुपये घेऊन खरेदीदाराची फसवणूक केल्याचा गुन्हा काशिगाव पोलिसांनी दाखल केला आहे.

कांदिवलीच्या वडार पाडा, लोकमान्य चाळ येथे राहणारे सुरेश हरिराम यादव हे मजुरी करतात. २०१४ मध्ये उमेश रामन चौधरी याने त्याचे नाव नसलेली जागा स्वतःच्या नावे व कब्जात आहे असे सांगून यादव यांच्याकडून जागेचे १० लाख रुपये घेतले. तसेच जागेवर बांधकामासाठी ३ लाख ५० हजार रुपये असे एकूण १३ लाख ५० हजार रुपये घेतले. परंतु इतकी वर्षे झाली तरी चौधरी याने यादव यांना जागा आणि बांधकाम करून दिले नाही. तसेच पैसेही परत केले नाहीत. ती जागा चौधरी याची नसताना त्याने फसवणूक केल्याची खात्री झाल्यावर यादव यांनी काशिगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यावर १६ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी उमेश चौधरीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा-२.

# ३ वर्षांत १,३३७ प्रकरणांत घडवून आणला समझोता

## मीरा-भाईंदरच्या भरोसा सेलची लक्षणीय कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरच्या भरोसा सेलने गेल्या तीन वर्षांत महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांसंदर्भातील बहुतांश कौटुंबिक असलेल्या २,२६६ तक्रार अर्जांपैकी १,३३७ तक्रारी प्रकरणात समझोता घडवून आणला आहे. भरोसा सेलच्या वर्धापन दिनानिमित्त प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांनी ही माहिती दिली.

मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाचे तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते यांच्या हस्ते भाईंदर येथे १ ऑक्टोबर २०२१ रोजी आयुक्तालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भरोसा सेलची स्थापना करण्यात आली होती. त्याची धुरा सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांच्याकडे देण्यात आली. महिला, बालके व ज्येष्ठ नागरिक आदींच्या कौटुंबिक स्वरूपातील तक्रारींवर तोडगा काढण्याच्या अनुषंगाने सुरू केलेल्या भरोसा सेलने अनेक कुटुंबे आणि दुभंगलेली मने जुळवण्याचे काम केले आहे.

भरोसा

### सात जण परदेशातून सुखरूप भारतात

२०२१ पासून ते अद्यापपर्यंत भरोसा सेलमध्ये एकूण २,२६६ तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १,३३७ अर्जांमध्ये समझोता घडवून आणण्यात आला आहे. जवळपास ५९ टक्के अर्जांमध्ये समझोता घडवून आणण्यास भरोसा सेलला यश प्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर परदेशात कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेल्या पीडित महिलेस तसेच कामानिमित्त परदेशात जाऊन अडकलेल्या एकूण सात लोकांना भारतीय दूतावासांच्या मदतीने मदत पुरवून सुखरूप भारतात परत आणण्यात भरोसा सेलला यश प्राप्त झाले आहे.

भरोसा सेलच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे व सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळसह समझोता झालेले कुटुंबीय, पोलिस ठाण्यांतील बालकल्याण अधिकारी, महिला दक्षता समिती, समुपदेशक व भरोसा सेलचे पोलिस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. भरोसा सेल येथे समुपदेशक म्हणून वकील, डॉक्टर, समाजसेवक, एनजीओ सदस्य असे एकूण २३ समुपदेशक विनामूल्य काम करीत आहेत. त्यांना अविनाश अंबुरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

# मोबाइल चोरट्यास पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** नया नगर पोलिस ठाण्यात मोबाइल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीने आणखी मोबाइल चोरीचे गुन्हे केल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नालासोपारा, अलकापुरी क्रॉस रोडवरील यमुनोत्री इमारतीत राहणारे दीपांकर समर दास हे १६ ऑक्टोबरच्या सकाळी मीरारोड पूर्वेला रेल्वे स्टेशन बाहेर बसस्टॉप येथे बससाठी थांबले होते. बसमध्ये चढत असताना त्यांचा ३३ हजार रुपयांचा मोबाइल चोरी करण्यात आला. मोबाइल चोरी करणाऱ्या जयेश बाबू शेट्टी (४६, रा. विठ्ठल मंदिरजवळ, मोहपाडा कटाई गाव, कल्याण शिळफाटा रोड, डोंबिवली पूर्व) या मोबाइल चोरास १६ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

सामना पा.नं.१.

## मिंध्यांनी घाईगडबडीत लोकार्पण उरकले

# घोडबंदरमधील शिवरायांचा अश्वारूढ पुतळा अंधारात

भाईंदर, दि. १८ (सा.वा.) - मीरा-भाईंदर महापालिकेने घोडबंदर येथे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. मात्र पुतळा परिसरात प्रकाश व्यवस्था केली नसल्याने पुतळा अंधारात आहे. शिवाय चौथरा सुशोभीकरणही रखडले आहे. आचारसंहिता लागण्याच्या धास्तीने मिंधे गटाने २३ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते घाईगडबडीत पुतळ्याचे लोकार्पण उरकून घेतले. मात्र महिना उलटला तरी पुतळा परिसरात प्रकाश व्यवस्था करण्याचे भान मात्र ना मिंधे गटाला आहे ना पालिका प्रशासनाला. त्यामुळे मिंधे गटाच्या चमकोगिरी विरोधात शिवप्रेमींमध्ये प्रचंड नाराजी आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी मीरा-भाईंदर महापालिकेच्या महासभेने २ फेब्रुवारी २०१९ रोजी ठराव मंजूर केला होता. त्यानंतर २०२१ साली घोडबंदर येथे ३० फूट अश्वारूढ पुतळा बसविण्यासाठी २ कोटी ९५ लाखांचा ठेका गारनेट इंटिरिअर कंपनीला दिला. दोन वर्षांत पुतळा बसवला जाईल असे पालिकेने जाहीर केले होते. मात्र यासाठी तीन वर्षे लागली. पुतळा परिसर सुशोभीकरण आणि प्रकाश व्यवस्था यासाठी आणखी तीन महिने लागणार होते. ही कामे पूर्ण झाली नसतानाच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी घाईगडबडीत २३ ऑक्टोबर रोजी या पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मात्र उद्घाटन होऊन एक महिना उलटला तरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ योग्य लाईट व्यवस्था अद्याप करण्यात आलेली नाही. अंधारामुळे पुतळा दिसत नसल्याने नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत.

### प्रशासनाला गांभीर्य नाही

शिवरायांचा अश्वारूढ पुतळा परिसर अंधारात असल्याने शिवप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबीत यांनी लवकरात लवकर त्या ठिकाणी हायमास्ट लाईट बसवण्यात येतील आणि चौथरा सुशोभीकरण करण्याचे काम हाती घेण्यात येईल असे सांगून वेळ मारून नेली. प्रशासनाला गांभीर्य नसल्याने शहरवासीयांमध्ये संताप आहे.

## बोगस डॉक्टर

वसई : कोणतीही वैद्यकीय पदवी नसतानादेखील नवघर येथील आझादनगर परिसरातील बोगस डॉक्टर दवाखाना थाटून रुग्णांवर उपचार करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याची माहिती मिळताच नवघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता पटेल यांनी घटनास्थळी धाड टाकली. यावेळी इस्तेखार शेख हा बोगस कागदपत्रांच्या जोरावर आयुर्वेदिक दवाखाना थाटल्याचे समोर आले. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## घरफोडी

नालासोपारा : श्रीप्रस्था रोडवरील बिल्डिंग नंबर ८३ मध्ये राहणाऱ्या नॅन्सी स्वारेस या वृद्ध महिलेच्या घरात चोरट्याने प्रवेश केला. बेडरूममधील लोखंडी कपाटातून १ लाख ९८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. नालासोपारा पोलिसांनी फातिमा शेखवर गुन्हा दाखल करून अटक केली आहे. याचा अधिक तपास नालासोपारा पोलीस करीत आहेत.

## सोनसाखळी लंपास

नालासोपारा : संतोष भवनच्या जय माँ दुर्गा चाळीत राहणाऱ्या दीपक ठाकूर यांच्या गळ्यातून दीड तोळ्यांची सोनसाखळी खेचून चोरट्यांनी पळ काढला. रात्री पावणेबाराच्या सुमारास ठाकूर हे घराबाहेर पडले असता पाठीमागून आलेल्या चोरट्यांनी त्यांना खाली पाडून गळ्यातील सोनसाखळी लंपास केली. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

लोकमत ५-पा-१.

# मीरा रोडमध्ये घरफोडी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : जीसीसी क्लबजवळील रवी अंगण बिल्डिंगमध्ये बालाजी अय्यर हे राहतात. पूजापाठ करणारे बालाजी हे त्यांच्या आईसह १५ ऑक्टोबर रोजी सकाळी कामानिमित्त बाहेर गेले होते. सायंकाळी ५ वाजता घरी आल्यावर पाहिले असता घराच्या दरवाजाचे लॉक तोडलेले आढळले. शयनगृहातील कपाटाच्या तिजोरीत ठेवलेली २५ हजारांची रोख रक्कम, सोन्याची व चांदीची नाणी, कानातले, मंगळसूत्र असे दागिने चोरीला गेले होते. एकूण ९७ हजारांचा मुद्देमाल चोरीला गेल्याप्रकरणी काशिगाव पोलिस ठाण्यात अनोळखी चोरट्याविरुद्ध १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुलीला मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगावच्या सोमेश्वरनगर येथे राहणाऱ्या सुमय्या (वय ५) या चिमुकलीला बुधवारी मारहाण झाल्याने नायगाव पोलिसांनी गुरुवारी बालसंरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. मुलीचा बाप मोहम्मद जाफर खातून (वय ३०) याने तिला मारहाण करून गालांवर चावा घेत नखे मारून दुखापत केली आहे.

Scanned with OKEN Scanner

सामना पा-नं.८.

## पालिकेत नोंदणी केलेल्या गाड्यांमधूनच होणार पाणीपुरवठा

# मीरा-भाईंदरमधील टँकरमाफियांचे कंबरडे मोडणार

भाईंदर, दि. १८ (सा.वा.) - पाणीटंचाईचा गैरफायदा घेत अनेकदा टँकरमाफिया अशुद्ध पाणीपुरवठा करून नागरिकांकडून अवाचेसवा रुपये उकळतात. मात्र मीरा-भाईंदरमध्ये आता टँकरचे पाणी हवे असेल तर आधी सोसायट्यांना पालिकेकडे नोंदणी करावी लागणार आहे. त्यानंतर अवघ्या हजार रुपयांत शुद्ध पाणी काही तासातच संबंधित सोसायटीला पुरवठा करण्यात येणार आहे. पालिकेच्या या टँकर धोरणामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. त्याशिवाय दूषित पाणीपुरवठा करून रहिवाशांना वेठीस धरणाऱ्या टँकरमाफियांचेदेखील कंबरडे मोडणार आहे.

### एक हजार रुपयांत शुद्ध पाणी, नव्या धोरणाने नागरिकांना दिलासा

मीरा-भाईंदर शहरात नव्याने बांधण्यात येणाऱ्या चार मजल्यावरील नवीन इमारतींना नळ जोडणी न देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्याशिवाय अनेक जुन्या सोसायट्यांनादेखील कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने तेथील नागरिक टँकरने पाणी मागवतात. परंतु महापालिकेने आता टँकर धोरण निश्चित केले आहे. यानुसार शहरातील जवळपास ०० टँकरचालकांना पाणीपुरवठा करायचा असेल तर आधी पालिकेकडे रितसर नोंदणी करणे गरजेचे आहे. याबरोबरच सोसायट्यांनाही पाणी हवे असल्यास त्यांना पाणीपुरवठा विभागाकडे नोंदणी करावी लागेल. यासाठी तेथे पैसे भरून पावती देण्यात येईल. त्यानंतर पाणीपुरवठा विभागातील अधिकारी त्या भागातील संबंधित टँकरचालकांना चलन व सोसायटीचे नाव पाठवतील. त्यानुसार कमी वेळेत आणि कमी पैशात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याचे नियोजन पालिकेने केले आहे.




### सीसीटीव्हीची नजर राहणार

महापालिकेचे भाईंदर फाटक येथे जलकुंभ आहे. या ठिकाणाहून टँकरचालकांना पाणी भरून शहरात वितरित करता येणार आहे. तसेच अन्य ठिकाणाहूनदेखील पाणी उचलता येणार आहे. मात्र नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा व्हावा याकरिता पालिकेने जलकुंभाच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच याठिकाणी जलमापक यंत्र बसवण्यात येणार असून दिवसभरात किती टँकर भरले याची इत्थंभूत माहिती मिळणार आहे. जिथून पाणी उचलण्यात येणार आहे त्या ठिकाणी २४ तास सुरक्षारक्षक तैनात केले जाणार आहेत.

### पालिका आयुक्तांच्या निर्णयाचे स्वागत

निकृष्ट कामामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था, ट्रॅफिकचा कोंडमारा तसेच तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाने वाढलेला भ्रष्टाचार यामुळे मीरा-भाईंदर शहराच्या विकासाचा पुरता विचका उडाला आहे. मात्र पालिका आयुक्त संजय काटकर यांच्या टँकर धोरणामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार असून टँकरमाफियांना चाप बसणार आहे. त्यामुळे या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

# घरची आर्थिक परिस्थिती बदलायची असेल तर तीन म्हशींचा बळी द्यावा लागेल

## तरुणीकडून दीड लाख उकळणाऱ्या तीन मांत्रिकांविरोधात गुन्हा दाखल

भाईंदर, दि. १८ (सा.वा.) - घरची आर्थिक परिस्थिती बदलायची असेल तर तीन म्हशींचा बळी द्यावा लागेल, अशी बतावणी करून एका २० वर्षीय तरुणीची तीन मांत्रिकांनी फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आपली फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या तरुणीने नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी या तिन्ही मांत्रिकांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

घरातील अडीअडचणी सोडवण्यासाठी सांताक्रुझ येथे राहणाऱ्या २० वर्षीय तरुणीने मांत्रिक मुस्ताक शाह याच्याशी संपर्क साधला. त्यानंतर शाह याने तिला एक पूजा घालण्याचा सल्ला दिला. या पूजेसाठी सुमारे ६४ हजार रुपये खर्च असल्याचेही त्याने सांगितले. त्यानुसार या तरुणीने ३२ हजार रुपये शाह याला रोख दिले आणि ३२ हजार रुपये रियाझ चौधरी या दुसऱ्या मांत्रिकाच्या खात्यात पाठवले. त्यानंतर शाह याने तरुणीला एक सुपारी दिली आणि घरी जाण्यास सांगितले. ही पूजा करण्यासाठी दोन म्हशींचा बळी दिला आहे, परंतु तुमच्या घरावर कोणीतरी काहीतरी केलेले आहे त्यासाठी आणखी एका म्हशीचा बळी द्यावा लागणार आहे अशी बतावणी करून ७५ हजार रुपये घेऊन येण्यास सांगितले.


तरुणीने ७५ हजार रुपये रियाझ चौधरी याच्या बँक खात्यात पाठवले. या पूजेमध्ये मोठे विघ्न आले आहे. त्यामुळे तुमच्या घरावर मोठे संकट येणार असल्याची भीती मुस्ताक शाह, जावेद, रियाझ चौधरी या तिघांनी तरुणीला दाखवली. पुन्हा पूजा करावी लागणार असे त्यांनी तिला सांगितले. आपली फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर या तरुणीने नयानगर पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

सामना पा.नं. ५.

# महिलेच्या हाताला पकडून ओढत नेणे विनयभंगच

## हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा, गुन्हा रद्द करण्यास नकार



मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) - महिलेच्या हाताला ओढत नेणे हा विनयभंगच आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत उच्च न्यायालयाने एका आरोपीचा विनयभंगाचा गुन्हा रद्द करण्यास नकार दिला.

राजेंद्र जगताप असे या आरोपीचे नाव आहे. शिर्डी साईबाबा मंदिरातून एका महिलेला हाताला धरून बाहेर काढल्याचा जगतापवर आरोप आहे. पीडितेने नोंदवलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी करणारी याचिका जगतापने केली होती. न्या. विभा कांकणवाडी व न्या. एस. जी. चंपळगावकर यांच्या खंडपीठाने वरील निर्वाळा देत ही याचिका फेटाळून लावली.

### गुन्हेगारी दबाव

▮ महिलेचा हात धरून ओढत नेण्याची कृती नेमकी कशासाठी होती, हे सिद्ध होणे आवश्यक आहे. मात्र हात धरून महिलेला ओढत नेणे हा विनयभंगाच्या व्याख्येतील गुन्हेगारी दबावच आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

### काय आहे प्रकरण

▮ जगताप साईबाबा मंदिरात कामाला होता. पीडिता नातलगांसोबत तेथे दर्शनासाठी गेली होती. तेथे जगताप आला व त्याने पीडितेला हाताला धरून बाहेर काढले. मंदिरातील सीसीटीव्हीमध्ये अशी कोणतीच कृती दिसत नाही. असे कृत्य करण्याचा माझा कोणताच हेतू असू शकत नाही. हा गुन्हा व त्याचे दाखल झालेले आरोपपत्र रद्द करावे, अशी मागणी जगतापने याचिकेत केली होती.

### सीसीटीव्हीमध्ये नेमके काय

▮ महानगर दंडाधिकारी न्यायालयाने सीसीटीव्हीमधील घटनेचा अहवाल सादर केला आहे. जगताप कोणाशी तरी बोलत असल्याचे दिसत आहे. अचानक त्यांचे बोलणे वाढले आहे. गर्दीमुळे तो नेमका कोणाशी बोलतोय हे कळत नाही. पीडिता तेथे दिसत आहे. काही वेळाने जगताप तेथून निघून गेला, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### अपशब्द उच्चारले

▮ जगतापने पीडिता व अन्य महिलांबाबत अपशब्द वापरल्याचाही आरोप आहे. त्याची न्यायालयाने नोंद करून घेतली. विनयभंगाचा गुन्हा रद्द होईल असे हे प्रकरण नाही. ही याचिका फेटाळली जात आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सामना पा-नं. ९.

### चारित्र्याच्या संशयातून नवऱ्याने केली हत्या

# पत्नीचा गळा आवळला.. मृतदेह ओलाने भावाकडे नेला

वसई, दि. १८ (सा.वा.) - चारित्र्याच्या संशयातून गळा आवळून पत्नीची हत्या केल्याची घटना वसईत घडली आहे. संतापजनक म्हणजे पुरावा नष्ट करण्यासाठी नराधम पतीने पत्नीचा मृतदेह चक्क ओलाने त्याच्या भावाच्या घरी पाठवून हे प्रकरण दडपण्यासाठी खोटा मृत्यूचा दाखला बनविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान मृत महिलेच्या कुटुंबीयांना संशय आल्याने त्यांनी शवविच्छेदन करण्याची मागणी केली. त्यामुळे नैसर्गिक मृत्यूचा हा बनाव उघड झाला. याप्रकरणी पोलिसांनी पती इस्माईल चौधरी आणि त्याच्या भावाला अटक केली. खुर्शिदा असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे.

वसईच्या कामण परिसरात राहणाऱ्या इस्माईल चौधरी (२४) याचे खुर्शिदा खातून (२१) हिच्यासोबत लग्न झाले होते. इस्माईलला पत्नीचे बाहेर कोणाशी संबंध असल्याचा संशय होता. त्यातून त्यांच्यात नेहमी वाद व्हायचे. बुधवारी दुपारी पुन्हा त्यांच्यात वाद झाला. यावेळी इस्माईलने ओढणीने खुर्शिदाचा गळा आवळून तिची हत्या केली. त्यानंतर पत्नीचा मृतदेह ओलाने नवजीवन येथे राहणाऱ्या त्याच्या भावाकडे नेला. यावेळी इस्माईलने पुण्यात राहणाऱ्या खुर्शिदाच्या भावाला फोन केला आणि तिच्या पोटात दुखत असल्याने मृत्यू झाल्याची माहिती दिली. दरम्यान हे प्रकरण दडपण्यासाठी डॉक्टरांकडून बनावट मृत्यू दाखला बनविण्याचा प्रयत्न सुरू असतानाच त्याच रात्री खुर्शिदाचा भाऊ घरी आला. त्याला संशय आल्याने शवविच्छेदनाची त्याने मागणी केली. त्यामुळे या प्रकरणाचा भंडाफोड झाला.

### फरार आरोपीला बेड्या

अंबरनाथ : मुलीचा सांभाळ नीट करत नाही म्हणून पत्नीची गळा चिरून हत्या केल्याची घटना पोवेगावात घडली. रुपाली लोंढे असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. हत्येनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. आरोपीला पकडण्यासाठी तीन पथके तयार करण्यात आली. आरोपी वाराणसी येथे लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून विकी लोंढेच्या मुसक्या आवळल्या.

पुण्यनगरी पृ. ५

# आमचे पैसे आले का? चौकशीसाठी लाडक्या बहिणींची बँकेत गर्दी

## वसई-विरारच्या बँकाबाहेर महिलांच्या लागल्या रांगा

■ त्यामुळे नालासोपाऱ्यातील बडोदा बँकेत महिलांची मोठी गर्दी झाली आहे .ज्यांच्या खात्यात पैसे आले आहेत त्या महिला पैसे काढण्यासाठी येत आहेत, तर ज्यांच्या खात्यात पैसे आले नाहीत अशा महिला अडचणीमुळे बँकेत पोहोचत आहेत.

■ या गर्दीमुळे बडोदा बँकेच्या व्यवस्थापकासह कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे .ग्राहक व कर्मचाऱ्यांना होत असलेल्या समस्या लक्षात घेऊन बडोदा बँकेचे व्यवस्थापक आनंद चौहान यांनी ग्राहकांना बँकेशी संबंधित कामकाज शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले आहे.



■ नालासोपारा: महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात न आल्याने आधार कार्ड लिंक करण्यासाठी वसई विरार मधील बँकांमध्ये पैसे न आल्याने लाडक्या बहिणींनी एकच तोबा गर्दी केली आहे .वसई-विरारच्या बँकांचा ताण वाढला आहे.अशा स्थितीत सरकारी बँकांबाहेर महिलांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत.

नालासोपाऱ्यातील बँक ऑफ बडोदासमोर दररोज महिलांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळतात. बँकेचे सर्व कर्मचारी व व्यवस्थापक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी परिश्रम घेत आहेत. महाराष्ट्र सरकारने महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी लाडकी बहीण योजना लागू केली आहे, त्याअंतर्गत बहुतांश महिलांच्या खात्यात पैसे येऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील महायुती आघाडी सरकारने १७ ऑगस्ट रोजी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना औपचारिकपणे सुरू केली. या योजनेचे हप्ते महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत.आता बँकांमध्ये महिलांची गर्दी वाढू लागली आहे. काही पैसे काढण्यासाठी येत आहेत तर काही अडचणी घेऊन बँकेत पोहोचत आहेत. अनेक महिलांना त्यांच्या खात्यांबाबत मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, जसे की पूर्वी उघडलेली खाती आता बंद झाली आहेत कारण कोणतेही व्यवहार झाले नाहीत. याशिवाय आधार आणि मोबाईल लिंक करणे, खाती अपडेट करणे, पैसे काढणे या प्रक्रियेतही अडचणी येत आहेत.या समस्यांमुळे राज्यभरातील बँकांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. असेच दृश्य पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथील बडोदा बँकेत पाहायला मिळाले. महिलांची मोठी गर्दी असते, तसेच सर्व कामे एकाच वेळी करता येत नसल्याने दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे.



पुण्यनगरी पा.नं.१०

# आरोपीला अटकेचे कारण सांगणे बंधनकारक

## अन्यथा अटक 'बेकायदा' ■ उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

■ मुंबई: सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेताना अटकेचे कारण सांगणे बंधनकारकच आहे. आरोपीला अटकेचे कारण न सांगता केलेली अटक ही बेकायदा आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्वाळा देताना आरोपी प्रतीक रामणेची अटक बेकायदा ठरवत त्याला जामिनावर सोडून देण्याचे आदेश पोलिसांना दिले.

आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात टिळक नगर पोलिसांनी २६ मार्च २०२४ रोजी प्रतीकला अटक केली होती. नंतर कल्याणच्या विशेष न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. त्या विरोधात प्रतीक रामणेच्या वतीने ॲड. ऋषी भुता यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पोलिसांच्या अटकेलाच आक्षेप घेतला.

या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर



सुनावणी झाली. या वेळी ॲड. ऋषी भुता यांनी पोलिसांनी केलेल्या अटकेला जोरदार आक्षेप घेतला. पोलिसांनी प्रतीकला अटक करताना त्याला अटकेचे कारण सांगितले नाही. त्यामुळे राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधताना सर्वोच्च न्यायालयाचे निकाल सादर केले. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने त्यांचा युक्तिवाद ग्राह्य म्हणून घेताना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा संदर्भ दिला. त्या अनुषंगाने ॲड. भुता यांचा युक्तिवाद ग्राह्य म्हणून अर्जदार प्रतीकला जामिनावर सोडण्याचे आदेश दिले.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु. पा. ७.

# ज्येष्ठ नागरिकांना भुल देऊन लुटणाऱ्या टोळीला अटक

## लाखोंचा मुद्देमाल हस्तगत, गुन्हे शाखेची कामगिरी



**वसई :** जेष्ठ नागरीकांना बोलण्यात गुंतवून,हातचालाखीने त्यांचे दागिने लंपास करणाऱ्या सराईत आंतरराज्यीय टोळीला अटक करण्याची कामगिरी गुन्हे शाखेने केली असून या टोळीकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नालासोपारा पूर्वेकडील के.एम.पी.डी.शाळे समोरुन जाणाऱ्या एका महिलेला दोन जणांनी बोलण्यात गुंतवून,तिला ५ लाखांचे कागदी नोटांचे बंडल दिले आणि तिच्या गळयातील दिड तोळे वजनाची सोन्याची चेन काढून घेतली.त्यानंतर भानावर आलेल्या या महिलेने तुळींज पोलीस ठाणे गाठले.

याप्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हे शाखा कक्ष-३ ने तपास सुरु केला होता. त्यासाठी घटनास्थळावरील उपलब्ध सीसीटिव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले.

हे विश्लेषण आणि गोपनीय बातमीवरुन बोईसर येथील शंकर राय प्रभू राय आणि मंगल नायुराम सिलावट,सचिन चुनिलाल राठोड,राजुराय शंकर राय हे आरोपी निष्पन्न झाले.त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले.त्यांची कसून चौकशी केली असता,त्यांनी तुळींज आणि विरार पोलीस ठाण्याच्या हद्दित केलेले गुन्हे कबूल केले.

त्यांच्याकडून ३ लाख रुपये किंमतीचे ४.५ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक प्रमोद बडाख,सहाय्यक पोलीस नीरिक्षक सोपान पाटील,उपनिरीक्षक उमेश भागवत,सहाय्यक फौजदार अशोक पाटील,हवालदार मनोज चव्हाण,सचिन घेरे,मुकेश तटकरे,सागर बारवकर,अश्विन पाटील,सुनील पाटील,युवराज वाघमोडे,सुमित जाधव,मनोहर तरडे,तुषार दळवी,आतिश पवार,प्रवीण वानखेडे,गणेश यादव,सागर सोनवणे,संतोष चव्हाण यांनी ही कामगिरी केली.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु-५ा-२.

# पेल्हार पुलिस ने किया पर्दाफाश

## पति व उसके भाई के खिलाफ हत्या का मामला दर्ज, दोनों गिरफ्तार

### पत्नी की ओढनी से गला घोंटकर पति ने की थी हत्या

■ नालासोपारा, (सं). कामण में रहने वाली 21 वर्षीय पत्नी की अचानक पेट दर्द से मौत हो जाने की झूठी अफवाह का पेल्हार पुलिस ने पर्दाफाश करते हुए इसकी जानकारी नायगांव पुलिस को दी. जिसके बाद उन्होंने गुरुवार की रात 24 वर्षीय आरोपी पति और उसके 34 वर्षीय भाई के खिलाफ हत्या व हत्या के सबूत मिटाने का मामला दर्ज कर देर रात दोनों आरोपियों को गिरफ्तार कर लिया. कामण के पाचावीपाडा चाली में इस्माइल चौधरी (24) और उसकी पत्नी खुर्शीदा चौधरी (21) रहते थे. बुधवार दोपहर जब आरोपी पति इस्माइल काम से घर आया, तो घर में उसकी पत्नी के साथ एक और शख्स नजर आया. इससे वह गुस्से में आ गया और उसने पत्नी का किसी और के साथ अनैतिक संबंध होने के की बात कहकर अपनी पत्नी की ओढनी से गला घोंटकर हत्या कर दी. इसके बाद इस्माइल ने नवजीवन इलाके में रहने वाले अपने भाई मुश्ताक चौधरी (34) को अपने घर बुलाया. और दोनों भाई उसके शव को उसी रात एक निजी वाहन से नवजीवन मुश्ताक के घर ले गए.



रात में पुणे में रहने वाले खुर्शीदा के भाई मोहम्मद शरीफ चौधरी को इस्माइल ने फोन कर बताया कि पेट दर्द के कारण उनकी मौत हो गयी है. साथ ही उनसे पूछा कि क्या वह दफ़नाने के लिए कब्र खोदकर रखें क्या, तो उन्होंने कहा कि वह पुणे से आ रहे हैं, तब तक उसे डॉक्टर या अस्पताल लेकर जाओ. उसके बाद दोनों भाई रात में डिप फ्रिजर लेकर आये और खुर्शीदा का शव उसमें रख दिया. खुर्शीदा का भाई बुधवार रात पुणे से नवजीवन आया और उसके शव को नालासोपारा के मनपा अस्पताल ले गया. इसीलिए बीच पेल्हार पुलिस को सूचना मिली कि रात में नवजीवन इलाके में कुछ गड़बड़ी हुई है. लेकिन नवजीवन पहुंचने पर उन्हें जानकारी मिली कि वह मनपा अस्पताल गये हैं.पेल्हार की अपराध जांच शाखा के पुलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपाले और उनकी टीम मनपा अस्पताल पहुंची और इस्माइल से पूछताछ की, तो उसने पुलिस को झूठा बताया कि खुर्शीदा की मौत पेट दर्द की वजह से हुई है. इसी दौरान पुलिस को खुर्शीदा की गर्दन पर निशान दिखाई दिया. जिसके बाद उन्होंने उसे विश्वास में लेकर पूछा कि जो कुछ हुआ वह सच्चाई बता दो. उसके पश्चात उसने पूरी घटना की जानकारी देते हुए बताया कि उसने उसकी ओढनी से गला दबाकर हत्या कर दी थी. पेल्हार पुलिस ने दोनों भाइयों को हिरासत में लिया और इसकी पूरी सच्चाई नायगांव पुलिस को बताई. नायगांव पुलिस मनपा अस्पताल आई और दोनों आरोपियों को हिरासत में लेकर पूछताछ के लिए पुलिस स्टेशन ले गई. खुर्शीदा के भाई की शिकायत पर पुलिस ने दोनों के खिलाफ मामला दर्ज कर गुरुवार रात दोनों आरोपी भाइयों को गिरफ्तार कर लिया है.



## कोरियोग्राफर रेमो डिसूजा के साथ पत्नी भी चपेट में

# सात लोगों के खिलाफ धोखाधड़ी का मामला दर्ज

■ मीरारोड, (सं). प्रसिद्ध कोरियोग्राफर रेमो डिसूजा, उनकी पत्नी सहित फेम प्रोडक्शन कंपनी के 7 लोगों के खिलाफ मुंबई उच्च न्यायालय के आदेश पर मीरारोड पुलिस थाने में मामला दर्ज किया गया है. वी अनबीटेबल डांस ग्रुप ने प्रोडक्शन कंपनी पर 11 करोड़ 96 लाख 10 हजार रुपए के धोखाधड़ी किए जाने का आरोप लगाया है. रेमो डिसूजा बॉलीवुड इंडस्ट्री के जाने-माने कोरियोग्राफर, फिल्म डायरेक्टर और प्रोड्यूसर हैं. उन्होंने कई फिल्मों में कोरियोग्राफी की है और वह बॉलीवुड के जाने-माने कोरियोग्राफर माने जाते हैं. मीरा रोड पुलिस थाने में शिकायत दर्ज कराई गई थी कि उन्होंने और उनके अन्य साथियों ने मिलकर भाईदर के एक डांस ग्रुप वी अनबीटेबल के साथ धोखाधड़ी की है. इस शिकायत पर कोई कार्रवाई नहीं होने पर डांस ग्रुप ने बॉम्बे हाई कोर्ट में याचिका दायर की. इस याचिका में कोर्ट ने पुलिस को 4 सप्ताह के अंदर जांच कर रिपोर्ट पेश करने का आदेश दिया था. पुलिस आयुक्त के आदेशानुसार क्राइम ब्रांच वसई यूनिट के



पुलिस निरीक्षक ने जांच कर रिपोर्ट सौंपी. इसके बाद मीरारोड पुलिस स्टेशन में धोखाधड़ी का मामला दर्ज किया गया है.दरअसल जैसलपार्क चौपाटी पर डांस की प्रैक्टिस करते समय भाईदर निवासी डांसर वीर नरोत्तम की मुलाकात 2014 में ओमप्रकाश चौहान से हुई थी. उस समय चौहान ने नरोत्तम के डांस की तारीफ करते हुए कहा था कि आप अच्छा डांस करते हैं.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं. 9.

**सुप्रीम कोर्ट का सुझाव** • संसद बाल विवाह को गैरकानूनी घोषित करने पर विचार करे

# बाल विवाह बच्चों की आजादी छीनते हैं इसे रोकने के कानून में खामी : सुप्रीम कोर्ट

ऐसे विवाह संवैधानिक अधिकारों का उल्लंघन करते हैं

भास्कर न्यूज | नई दिल्ली

सुप्रीम कोर्ट ने बाल विवाह की 'सामाजिक बुराई' को 'गंभीर' करार देते हुए इससे निपटने के लिए केंद्र और राज्य सरकारों को दिशा-निर्देश जारी किए हैं। सीजेआई डीवाई चंद्रचूड़, जस्टिस जेबी पारदीवाला और जस्टिस मनोज मिश्र की पीठ ने 141 पन्नों के फैसले में कहा- 'बाल विवाह पसंद का जीवनसाथी चुनने की स्वतंत्रता छीन लेते हैं। ये संवैधानिक अधिकारों का उल्लंघन करते हैं। बच्चों की स्वतंत्रता, पसंद, आत्मनिर्णय और बचपन का आनंद लेने के अधिकार से वंचित करते हैं। कम उम्र में शादी से दोनों पक्षों (लड़के-लड़की) पर प्रतिकूल असर पड़ता है। बाल विवाह रोकथाम अधिनियम किसी भी 'पर्सनल लॉ' की परंपरा से बाधित नहीं हो सकता।'

कोर्ट ने 'सोसायटी फॉर एनलाइटनमेंट एंड वॉलंटरी एक्शन' एनजीओ की याचिका पर यह फैसला दिया। इसमें बाल विवाह-रोधी कानून प्रभावी रूप से लागू करने की मांग की गई थी। कोर्ट ने कहा- '21 दिसंबर, 2021 को संसद में पेश 'बाल विवाह रोकथाम (संशोधन) विधेयक' जांच के लिए संसद की स्थायी समिति को भेजा गया था। संशोधन इसलिए लाया गया था, ताकि विभिन्न पर्सनल लॉ के चलते बाल विवाह रोधी कानून पर असर न पड़े। हालांकि यह अभी संसद के समक्ष विचाराधीन है। सीजेआई ने संसद को सुझाव दिया कि वह बाल विवाह रोकथाम अधिनियम (पीसीएमए), 2006 में संशोधन कर बाल विवाह को गैरकानूनी घोषित करने पर विचार करे। कोर्ट ने सार्क देशों, अफ्रीकी, यूरोपीय संघों के बाल विवाह पर कानूनी ढांचे का जिक्र करते हुए कहा कि देश के मौजूदा कानून में कुछ खामियां हैं। इसके बाद सुझाव दिया कि अलग-अलग समुदाय के हिसाब से अलग रणनीति बनाई जाए। कोर्ट ने केंद्र, राज्यों, जिला प्रशासन, पंचायत और न्यायपालिका को कई निर्देश दिए।

## निर्देश... हर जिले में अलग अफसर नियुक्त हो, 'बाल विवाह मुक्त गांव' घोषित करें, फास्ट ट्रैक कोर्ट बनाएं

- राज्य और केंद्र शासित क्षेत्र जिला स्तर पर चाइल्ड मैरिज प्रिवेंशन ऑफिसर नियुक्त करें। कलेक्टर और एसपी भी जवाबदेह होंगे।
- व्यक्तिगत जवाबदेही तय करने और बाल विवाह रोकने के लिए राज्य हर तीन महीने में रिपोर्ट अपलोड करें। राज्य महिला एवं बाल विकास और गृह मंत्रालय इसकी समीक्षा करें।
- स्थानीय लोगों के साथ प्रभावी सामुदायिक सहभागिता तकनीक विकसित की जाए।
- राज्यों के गृह मंत्रालय स्पेशल जुवेनाइल पुलिस यूनिट बनाने पर विचार करें।
- राज्य स्पेशल चाइल्ड मैरिज प्रोहिबिशन यूनिट बनाएं। इसमें पांच सामाजिक कार्यकर्ताओं को रखा जाए, जिनमें 2 महिलाएं जरूर हों।
- मजिस्ट्रेट स्वतः संज्ञान लेकर निर्देश जारी कर सकेंगे। केंद्र, राज्य सरकारों के साथ मिलकर ऐसे मामलों के लिए फास्ट-ट्रैक कोर्ट बनाएं।
- कोई सरकारी कर्मचारी बाल विवाह में शामिल पाया गया तो उस पर कानूनी कार्रवाई की जाए।
- 'खुले में शौच से मुक्त गांव' की तर्ज पर 'बाल विवाह मुक्त गांव' की पहल हो। ऐसे गांवों और ग्राम पंचायतों को 'बाल विवाह मुक्त' सर्टिफिकेट दिया जाए। सामुदायिक नेतृत्व को सक्रिय भूमिका के लिए प्रोत्साहित किया जाए।
- स्कूलों, धार्मिक संस्थाओं और पंचायतों में जागरूकता कार्यक्रम चलाए जाएं। स्थानीय भाषा में प्रभावी होर्डिंग्स और स्लोगन बनाए जाएं।
- राज्यों को डब्ल्यूएचओ की अनुशंसा के अनुरूप 'सेक्स एजुकेशन' का फ्रेमवर्क स्कूली पाठ्यक्रम में जोड़ना चाहिए।
- स्कूल, पंचायत, स्थानीय संस्थाओं में चाइल्डलाइन (1098) और महिला हेल्पलाइन (181) की जानकारी दी जाए। बच्चों को बताया जाए कि कैसे मदद ली जाती है।
- सुप्रीम कोर्ट ने इस मामले में सभी पक्षों को एक साल बाद स्टेटस रिपोर्ट देने को कहा है।

### लड़कियों का अधिकार छिन जाता है

कोर्ट ने यह भी कहा, 'शादी के बाद एक लड़की से बच्चों को जन्म देने और प्रजनन क्षमता साबित करने की उम्मीद की जाती है। बच्चे को जन्म देने के निर्णय लड़की से ले लिए जाते हैं। एक बच्चे के रूप में विवाहित महिला की पसंद और स्वायत्तता का अधिकार बाल विवाह की प्रणाली द्वारा उल्लंघन किया जाता है। जब नाबालिग लड़कियों को वैवाहिक संबंध बनाने के लिए मजबूर किया जाता है, तो वे तनाव का अनुभव करती हैं।'



## कोर्ट के फैसले की शुरुआत रुखमाबाई के 139 साल पुराने पत्र से

*मैं उन अभागी महिलाओं में से एक हूं, जिन्हें बाल विवाह की प्रथा के कारण हुए दुख झेलने पड़े। इस बुरी प्रथा ने मेरी खुशियां नष्ट कर दीं। यह मेरे और उस चीज के बीच आती है, जिसे मैं अन्य सभी चीजों (शिक्षा और मानसिक सुधार) से ऊपर मानती हूं। मेरी जरा भी गलती नहीं है, इसके बावजूद मैं अकेलेपन के लिए अभिशप्त हूं।'* (26 जून 1885 को लिखा)

(रुखमाबाई पहली महिला थीं, जो तलाक मांगने के लिए कोर्ट पहुंची थीं। वर्ष 1864 में जन्मी रुखमा का विवाह उनकी विधवा मां ने 11 की उम्र में कर दिया था। लेकिन वे कभी ससुराल नहीं गईं। 1887 में याचिका लगाई। इस केस के बाद ही भारत में 'एज ऑफ कंसेंट एक्ट 1891' पारित हुआ।)

Scanned with OKEN Scanner

The Time of India page-H03

page.-3



# Man 'kills' wife, carries body in cab to brother's place; both held

Sandhya.Nair@timesofindia.com

**Mumbai:** Just a year into their marriage, a 24-year-old man allegedly strangulated his 23-year-old wife at their residence in Kaman, Naigaon (East). The couple reportedly frequently argued as the husband, Ismail Choudhary, suspected the victim, Khurshida Khatun, was involved with another man. On Wednesday afternoon, their fight escalated and Choudhary allegedly strangled Khatun with his hands. Pelhar police found strangulation marks on Khatun's neck.

Police said that in a state of panic, Choudhary, who works with a private firm, called an aggregator cab and transported his wife's body to his brother, Mustaq's (34) residence in Navjeevan, Nalasopara (East), approximately 12km away. He told the driver that his wife was unwell and needed to be taken to his brother's place.

Upon arriving there, Choudhary explained the situation to Mustaq and contacted Khatun's brother Mohammed in Pune, claiming she had been unwell for several days and had succumbed to the ailment on Wednesday. Police said Chaudhury asked Mohammed if he could perform the last rites. He asked Choudhary to wait for him to reach Naigaon.

Choudhary then sought a doctor to obtain a death certificate, claiming his wife had died due to ill health. The doctor grew suspicious when Choudhary was hesitant to allow him to examine the body at his brother's home. The body was kept in Mustaq's home till late evening. The doctor alerted Pelhar police, who detained Choudhary for questioning.

Meanwhile, Khatun's brother arrived from Pune and demanded an autopsy, stating he was unaware of his sister's alleged illness until Choudhary called him.

Pelhar police arrested Choudhary and his brother, and handed over the case to Naigaon police.

Upon questioning, Choudhary reportedly confessed to the crime. Police went to his brother's residence and collected the body for an autopsy. The autopsy report is pending to determine the cause of death.

Choudhary reportedly told cops that an unidentified man was at home when he returned from work on Wednesday.

Both Choudhary and Mustaq have been booked under BNS sections for murder and destruction of evidence.

Police plan to question the aggregator cab driver and review the closed-circuit television footage as part of their investigation. The doctor's statement will be recorded too.

The Times of India. page. H. 1

## Man kills wife, takes body in cab

A Naigaon man (24) allegedly strangled his wife suspecting her fidelty and shifted her body in a cab to his brother's Nalasopara home for a doctor's certificate. The victim's brother insisted on an autopsy, which nailed him. P3

Scanned with OKEN Scanner